
सत्यमेव जयते



डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ **Website:-** www.barti.in **E-mail:** - dg@barti.in

जा.क्र/बार्टी-पुणे/BANRF अधिछात्रवृत्ती जाहिरात/२०२६-२०२७/ ७०५८ दिनांक-०६ /११/२०२६

पीएच.डी अधिछात्रवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२३,२०२४ व २०२५ बाबत घोषणापत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) योजना राबविली जाते. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार बार्टी, पुणे संस्थेमार्फत **दिनांक १ जानेवारी २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५** या कालावधीत पीएच.डी करीता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून पीएच.डी अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करीता दिनांक ०१/०८/२०२६ पासून दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी दिनांक २७/०८/२०२६ रोजीच्या घोषणापत्रकाद्वारे दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत प्रथम व दिनांक १५/०९/२०२६ रोजीच्या घोषणापत्रकाद्वारे दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत दुसरी मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक ३०/०९/२०२६ अखेर भरलेल्या ऑनलाईन अर्जानुसार प्राप्त ऑनलाइन अर्जाची व आवश्यक कागदपत्रांची हार्ड कॉपीची छाननी करण्यात आली आहे. कागदपत्रे छाननी दरम्यान ज्या विद्यार्थ्याच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आहेत अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून ईमेल पाठविण्यात आलेले आहेत.

सर्व विद्यार्थ्यानी ऑनलाईन स्वरूपात अर्ज केलेल्या **https://fellowship.trti-maha.in** या पोर्टल ला भेट द्यावी व अर्जाची सद्यस्थिती तपासावी. तसेच प्राप्त ईमेल नुसार त्रुटी पूर्तता करावी. **त्रुटी पूर्तता करण्याची अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२६** असून त्यानंतर विद्यार्थ्यांना कोणत्याही स्वरूपात मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्राची हार्ड कॉपी बार्टी, पुणे कार्यालयास पाठविली नाही **त्यांनी दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत** खालीलप्रमाणे दिलेल्या पत्त्यावर ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्राची हार्ड कॉपी पाठवावी. तदनंतर प्राप्त अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे, क्वीन्स गार्डन, जुना सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११ ००१

स्वाक्षरी /-
(दिपा मुधोळ-मुंडे)
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.